रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

### दिल्लीतील यशामागे अमित शहांचे कष्ट

# आम्हाला अपेक्षित यश मिळाले नसले तरी खूप शिकायला मिळाले ;अजित पवारांची प्रतिक्रिया

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले. मागील १० वर्षांपासून सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावे लागले. दिल्ली विधानसभा निवडणुकीतील या यशामागे अमित शहा यांचे कष्ट आणि निवडणूक व्यवस्थापनाचेही मोठे योगदान असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला दिल्ली विधानसभेत अपेक्षित यश मिळाले नसले, तरी या निवडणुकीतून आम्हाला खूप शिकायला मिळाले, असेही ते म्हणाले.

भाजपने सुमारे २७ वर्षांनंतर दिल्लीत पुनरागमन केले. २०२० मध्ये फक्त ८ जागा मिळालेल्या भाजपने यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सुमारे ४५ पेक्षा अधिक जागांवर आघाडी घेतली आहे. तर आम आदमी पार्टीला २२ जागांवर समाधान मानावे लागणार आहे. विशेष म्हणजे आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पराभवाचा सामना करावा लागला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने देखील उमेदवार उभे केले होते. मात्र सर्वांना पराभव स्वीकारावा लागला. यावर अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत त्यांनी भाजपचे अभिनंदन केले.दिल्ली विधानसभेतील निर्णायक विजयाबद्दल मी प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्र मोदी जी, केंद्रीय गृहमंत्री मा.श्री. अमित शहा जी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री जे.पी नड्डा जी यांचं मनापासून अभिनंदन करतो. दिल्लीत स्थापन होणाऱ्या नवीन



सरकारला उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा देतो.दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'चा प्रमुख घटकपक्ष असलेल्या भाजपला मिळालेल्या ४० हून अधिक जागा या प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचं प्रतिक आहेत. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही प्रधानमंत्र्यांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या सर्वांगीण विकासाला दुप्पट गती मिळेल. चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, उत्तम शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधांचे, देशाच्या राजधानीचे सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला.दिल्लीतील भाजपच्या यशामागे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कष्ट व निवडणूक व्यवस्थापनाचेही मोठे योगदान आहे. दिल्ली भाजपचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव आणि त्यांच्या टीमने घेतलेली मेहनतही महत्वाची ठरली, असे अजित पवार यांनी म्हटले.राष्ट्रवादी काँग्रेसला दिल्ली विधानसभेत अपेक्षित यश मिळालं नसले तरी या निवडणुकीतून आम्हाला खुप शिकायला मिळाले आहे. ही सुरुवात आहे. मिळालेल्या अपयशाचे विश्लेषण करुन भविष्यात देशपातळीवर पक्षबांधणीसाठी अधिक मेहनत घेतली जाईल. दिल्लीसह इतर अन्य राज्यात पक्षाचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल.दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाचा मोठा पराभव झाला आहे. दिल्लीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ३० उमेदवार उभे केले होते. या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. पक्षाला या निवडणुकीत केवळ ०.०३ टक्के मते मिळाली आहेत. जुलै २०२३ मध्ये अजित पवार आणि शरद पवार गटात राष्ट्रवादीचे विभाजन झाल्यानंतर दिल्लीतील ही पक्षाची पहिलीच निवडणूक होती. मात्र, या निवडणुकीतही त्यांना फारसे यश आले नाही.

# त्यागमूर्ती रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांचे कार्य करता यावे म्हणून माता रमाबाईंनी स्वतः पत्करलेला त्याग, इच्छा–अपेक्षांची दिलेली आहुती कधीही विसरता येणार नाही. असे प्रतिपादन बहुजन नेते तथा माजी जि.प.सदस्य दशरथराव लोहबंदे यांनी केले. त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त ते बोलत होते.

मुखेड शहरातील फुलेनगर येथे माता रमाई जन्मोत्सव माजी नगरसेविका सुमनबाई लोहबंदे यांच्या नेतृत्वात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी तक्षशिला महाबोधी महाविहार




फुलेनगर येथुन माता रमाई व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची शहरातील प्रमुख मार्गाने भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिला व मुलींनी भीमगितांवर लेझीम नृत्य सादर केले. मिरवणुकीत पोलिस निरिक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी चौख बंदोबस्त ठेवला होता. जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी राहुल लोहबंदे मित्रमंडळाचे प्रमुख अशितोष कांबळे यांनी परिश्रम घेतले. या मिरवणुकीत मध्ये हजारो महिला,पुरुष बांधव, युवती, अबालवृध्द मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिपभारती विद्यालयात दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती माध्य.व उच्च माध्य. विद्यालय दानापुर या ठिकाणी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मु.अ. श्री वाय.एस. गवळी होते त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पन केला . याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करतांना शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली .यावेळी दानापूर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सोळंके सर व शाळेचे शिक्षक श्री कापरे वाय.एच. ,श्री पवार एस.डी.,श्री कळात्रे एस.एस., श्री सुसर आर. जी., श्रीमती




कांबळे व्हि. टी., व श्री जंजाळ एस.बी. यांनी विदयार्थ्यांना भावी वाटचालीसाठी मार्गदर्शन करून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या .कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नंदीनी सोनवणे व गायत्री वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन रुपाली दळवी व कविता पिसे यांनी केले . कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

# आमदार श्री विक्रमसिंह पाचपुते यांच्या आभार दौर्याला मतदार संघातील जनतेचा उंदड प्रतिसाद



लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा मतदार संघातील जनतेने भरभरुन मतदान केल्याने जनतेचे आभार मानण्यासाठी तालुक्यांचे युवा आमदार विक्रमसिंह पाचपुते संपूर्ण तालुक्यात आभार दौर्याला सुरुवात केली याला जनतेने भरभरुन प्रतिसाद दिला आहे आज आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी तालुक्याच्या पूर्व भागातील गावांना भेटी दिल्या टाकळी कडेवळीत येथे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे जोरदार स्वागत व सत्कार करण्यात आला या वेळी ग्रामस्थांनी काही कामाच्या सुचनाही आमदार विक्रमसिंह पाचपुते यांना दिल्या यावेळी बोलताना भाजपाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब घोलप यांनी कुकडीच्या पाण्याबाबत आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे लक्ष वेधले घोलप म्हणाले की डि वाय १४ चारीला टाकळी कडेवळीत ला पाणी मिळत नाही कायमच आमच्यावर कुकडी कडुन अन्यायकारक वागणुक मिळते आहे यामध्ये आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी लक्ष घालून आमचा पाणी प्रश्न निकाली काढावा यावेळी बोलताना आमदार पाचपुते म्हणाले की डि वाय १४ चारीला डिमांड वाढवा पाणी वापर संस्था करा मि अधिकार्यांना पाठवितो तसेच वराडदेवी रस्ताही लवकरच मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करतो असे पाचपुते यांनी सांगितले तसेच घोड कॅनलला पाणी येत्या २५ फेब्रुवारी रोजी अवतरण सोडणार असल्याचे पाचपुते यांनी सांगितले यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांना पुढील वाटचालीसाठी ग्रामस्थांनी सुभेच्छा दिल्या व घोड कॅनलवर दिड कोटी रुपये खर्चून बांधलेल्या पुलाच्या व सोनवणे वस्ती वर दहा लाख रुपयांचा सभामंडप दिल्या बद्दल पाचपुते यांचे आभार मानले यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य रमेश गिरमकर पंचायत समिती सदस्य गणेश झिटे सह भाजपचे ओबीसी नेते भानुदास खामकर यांनी आपल्या खास शेरोशायरी मधुन आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे कौतुक केले तर भरत नवले अरुण जगताप गौवर्धन नवले विश्वनाथ इथापे यांनी स्वागत केले यावेळी सरपंच प्रफुल्ल इथापे नवनाथ वाळुंज शहाजी इथापे सहकारी सोसायटी चे अध्यक्ष नितीन वाळुंज मा.उप अध्यक्ष अशोक नवले पत्रकार दादासाहेब सोनवणे पत्रकार ज्ञानेश्वर येवले सह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बारावीची ११ फेब्रुवारीला तर दहावीची २१ फेब्रुवारीपासून परीक्षा

## विद्यार्थ्यांनी ताण घेऊ नये, अभ्यासाचे करावे अचूक वेळापत्रक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

इयत्ता बारावीची परीक्षा पुढील आठवड्यात ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाला शाळा–महाविद्यालय स्तरावर प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेत २० गुण आहेत.त्यामुळे टक्केवारी जास्त मिळावी, यासाठी प्रत्येकाने परीक्षा काळातील अभ्यासाचे अचूक नियोजन करणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळापत्रक बनवून त्यानुसार अभ्यास करावा, जेणेकरून चांगल्या गुणांनी तो विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकेल, असा विश्वास शिक्षणतज्ज्ञांना आहे.

परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे असतील, बाहेरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक असतील, बैठे पथक व भरारी पथकांचेही परीक्षेवर लक्ष असणार, ड्रोन कॅमेरे, परीक्षा हॉलमध्ये जाताना अंगझडती होईल, अशा बाबींची भीती कोणीही बाळगू नये. प्रत्येक परीक्षेवेळी अशा गोष्टी होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यासंदर्भात कोणताही ताण न घेता चांगला अभ्यास करावा. शांत, निवांत ठिकाणी जाऊन अभ्यास करावा, मोठ्याने वाचून अभ्यास केल्यास जास्त लक्षात राहातो.आपल्याला लक्षात ठेवायला किंवा पाठांतर करायला कठीण जाणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांचे वाचन करून त्यावर स्वत: नोट्स (महत्त्वाचे पॉईंट) काढा



आणि त्याचे वाचन केल्यास तो प्रश्न कठीण वाटणार नाही. गणितांचा सराव करावा, विज्ञानातील प्रयोग लक्षात ठेवावेत. इंग्रजीची उत्तरे लिहिताना स्पेलिंग चुकणार नाही, याची दक्षता घ्यावी. पास होणे फार कठीण नक्कीच नाही, आता फक्त चांगली टक्केवारी मिळावी यासाठी अभ्यासाचे वेळापत्रक चोख असणे आवश्यक आहे, असा सल्ला शिक्षणतज्ज्ञांनी दिला आहे.

### वेळापत्रक तयार करून परीक्षेला सामोरे जावे

विद्यार्थ्यांनी कोणताही ताण न घेता अत्यंत प्रसन्न भावनेने परीक्षा द्यावी. जीवनातील ही शेवटची परीक्षा नसून विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोचण्यासाठी अशा अनेक परीक्षा द्यायच्या आहेत. त्यामुळे कोणीही ताण न बाळगता अभ्यासाचे अचूक नियोजन, वेळापत्रक तयार करून परीक्षेला सामोरे जावे.

**–समीर गिरमकर,शिक्षक,सविंदणे हायस्कूल**

### अभ्यासाचे असे हवे वेळापत्रक...

**पहाटे साडेपाच ते सकाळी नऊ**
**सायंकाळी साडेपाच ते साडेसात**
**दररोज झोप किमान सात तास हवी**
**रात्री दहा–साडेदहानंतर जागरण शक्यतो नकोच**



# उपेक्षितांच्या वेदनांची समर्थपणे अभिव्यक्ती करणारा काव्यसंग्रह : 'वेशीबाहेर'

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

सामाजिक परिवर्तनाच्या वाटेवर रचनात्मक कार्याचा ध्यास घेऊन कार्यरत राहणारे व्यक्तिमत्त्व श्री. राजेश भांडे यांचा 'वेशीबाहेर' हा काव्यसंग्रह आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेतून नुकताच अनघा प्रकाशन, ठाणे यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. हा काव्यसंग्रह हाती पडल्यानंतर वाचून पूर्ण झाल्याशिवाय तो हातावेगळा होत नाही, हे या काव्यसंग्रहाचे बलस्थान आहे. यातील एक-एक कविता वाचताना मनात कविवर्य नारायण सुर्वे यांच्या खालील काव्यपंक्तींचे स्मरण होते.

**'कामगार आहे मी तळपती तलवार आहे,**
**सारस्वतांनो, थोडासा गुन्हा करणार आहे,**
**थोडे साहिलेले थोडे पाहिलेले थोडे जोखिलेले आहे,**
**माझ्या दुःखाची गंधवेणाही त्यात आहे.'**


याच ओळींना अनुसरून कवी राजेश भांडे यांच्या कविता आहेत. भांडे यांची ही कविता म्हणजे त्यांनी जीवनामध्ये जे अनुभवले, पाहिले, जे दुःख आणि वेदना सहन केल्या, त्यांची अभिव्यक्ती आहे. भोगलेल्या दुःखाच्या व जीवनानुभवाच्या संबंधी आपण काहीतरी ठोस बोलले पाहिजे, असे कवीला वाटते. जे वाटते, ते बोलल्यावाचून कवीला राहवतच नाही. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' अशी व्यक्त होण्याची अपरिहार्यता ही राजेश भांडे यांच्या कवितेचे उगमस्थान वाटते. त्यामुळेच ही कविता उत्स्फूर्त आणि म्हणूनच जिवंतही वाटते. पोटापाण्यासाठी सतत भटकंती करणाऱ्या जातीतील लोकांच्या काळीज पिळवटून टाकणाऱ्या वेदना, त्यांचे प्रश्न कवीने 'वेशीबाहेर' या संग्रहामधून समर्थपणे मांडले आहेत. 'वेशीबाहेर' या पहिल्याच कवितेत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातही भटक्यांची सद्यःस्थिती मांडताना कवी लिहितात,

'माथ्यावर गावाचं नाव नाही कुठेच गावठाण नाही
स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षांतही अन्न, वस्त्र, निवारा
आणि शिक्षणाचे नाव नाही
हजारो हातांना रोजगार नाही'

अशा शब्दांमधून बेरोजगार तरुणांची समस्या कवीने तळमळीने मांडली आहे. 'वेशीबाहेर' या काव्यसंग्रहात भटकंती करणाऱ्या वंचित आणि उपेक्षित लोकांचे जगणे, त्यांच्या हालअपेष्टा, त्यांचे साजरे न होणारे सणउत्सव, मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान साधनांचा अभाव यांचे वास्तवदर्शी चित्रण येते. 'डोंबारी' या कवितेत ते म्हणतात,

**'माझं जिणं उपेक्षितांचे ना सासर ना माहेर**
**रस्त्यावर चाले माझा**
**जन्म मृत्यूचा खेळ'**

बेघर, बेरोजगार राहून दरिद्री जीवन जगणाऱ्या लोकांना आपलं-परकं असं कोणीही नसतं. अशा शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या लोकांच्या जन्म-मृत्यूचा खेळ कवी संवेदनशील मनाने मांडतो. 'माझं सासर', 'झोपडी', 'अनाथ', 'माती', 'पिंडदान' या कविता वाचताना कवीची लेखनशैली किती सहज, सोपी आणि काळजाला थेट भिडणारी आहे, याची प्रचीती येते. कवितेची शीर्षकेही तितकीच आशयपूर्ण, नेमकी आणि गंभीर आहेत. या शीर्षकांवरूनच या कवितांचे वेगळेपण सूचित होते. 'माती' कवितेत ते म्हणतात,




**'मातीत जीव गहाण**
**मातीत गुंततो प्राण**
**मातीत पोसते बीज**
**मातीत पुनर्जन्म छान'**

अशा शब्दांमधून कवीची नाळ मातीशी किती जोडलेली आहे, याची कल्पना येते. त्यामुळेच या मातीतल्या कविता वाटतात. तसेच 'पिंडदान' या कवितेत श्राद्धकर्माच्या मागे समाजमनाची काय भावना असते, हे सहजपणे मांडताना कवी म्हणतो,

**'अरे कावळ्या कावळ्या**
**तू देवाहून श्रेष्ठ**
**चोचीमध्ये घास घेता**
**वंश होई समाधान'.**

अशा शब्दांत कवी परंपरा, रूढी, संकेत यांचा नवा अन्वयार्थ लावतो. 'वेशीबाहेर' या काव्यसंग्रहात वेदना, आक्रोश यांच्याबरोबरच थोर महात्म्यांच्या कार्याची महतीही वेगवेगळ्या कवितांच्यामधून कवीने सांगितली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले, बाबा आमटे यांच्या विचारांचा आणि कार्याचा उल्लेख अनेक कवितांत आढळतो. या महामानवांनी सांगितलेल्या समता, न्याय, बंधुत्व, सहनशीलता, सामाजिक समरसता, शांती, अहिंसा इ. उच्च मानवी मूल्यांचा अनेक ठिकाणी संदर्भ आलेला दिसून येतो. 'आमचं काय चुकलं', 'क्रांती', 'तरुणांनो', 'सगळे कसे मुरदाड झालेत', 'जागर', 'नामांतर' या कवितांमधून समाजातील विविध प्रश्नांची दाहकता कवीने सशक्तपणे मांडली आहे.

यातून कवीचे सूक्ष्म सामाजिक आकलन समोर येते. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी विषमतेविरुद्धच्या चळवळी अधिक बळकट होणे गरजेचे असते. म्हणून 'नामांतर' या कवितेमधून थंडावत चाललेल्या चळवळी पुन्हा नव्याने सुरू होण्यासाठी युवकांना साद घालताना ते म्हणतात,

'वर्षानुवर्षे धगधगणारी विषमतेची आग
कर्तृत्वाने विझवून टाका गड्यांनो' अशी साद घालत कवीने भगवान बुद्धांचे हास्य आणि महामानव डॉ. बाबासाहेबांचे परिवर्तनवादी विचारविश्व आपणच जिवंत राखले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या शब्दांमधून कवीची जीवनवादी जाणीव अधोरेखित होते. कवितेला कलात्मकतेचे साधन न मानता सामाजिक जाणीवेच्या आविष्काराचे माध्यम कवी मानताना दिसतो.

प्रस्तुत काव्यसंग्रहात वेशीबाहेरच्या जगण्यातील दाहक अनुभवाबरोबरच कवीच्या हृदयातील एक प्रेमळ व हळवा कोपराही 'गोंदन', 'सोबत', 'संक्रांत', 'वादळवेल', 'छेद' आणि 'हाक' या कवितांमधून दिसून येतो. त्यामुळे केवळ व्यथावेदनांची दाहकता व्यक्त करणे या स्वरूपाचा विलाप हाच एक सूर कवीला गवसलेला आहे, असे नसून प्रेमळ भावनांचा आलापही या कवितेतून प्रकटलेला दिसून येतो. हृदय आणि विचार हे दोन ध्रुव एकाच वेळी कवेत घेणारा कवी या संग्रहात जाणवत राहतो. 'वेशीबाहेर' हा एकंदरीत साठ कवितांचा उत्कृष्ट संग्रह आहे.

या काव्यसंग्रहाला ख्यातकीर्त लेखक 'उचल्याकार' लक्ष्मण गायकवाड यांची अतिशय उद्बोधक अशी प्रस्तावना लाभली आहे. तसेच प्रसिद्ध कवी प्रा. मुकुंद राजपंखे यांचे या कवितासंग्रहावरील 'दोन शब्द' अत्यंत समर्पक शब्दांत प्रस्तुत काव्यसंग्रहाचे सामर्थ्य व्यक्त करणारे आहेत. कवी श्री. राजेश भांडे यांचे या काव्यसंग्रहनिर्मितीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि भावी लेखन कार्यासाठी शुभेच्छा!

**-प्रा.डॉ शंकर लेखणे**

# श्री.आदिनाथ विठ्ठल पडोळे सर यांना शब्दगंध शैक्षणिक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

श्री.आदिनाथ विठ्ठल पडोळे सर यांना शब्दगंध शैक्षणिक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन! हा पुरस्कार त्यांचं शैक्षणिक क्षेत्रातील योगदान आणि कार्य याची प्रशंसा म्हणून दिला जातो.त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेलं महत्त्वपूर्ण कार्य प्रेरणादायी आहे.शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने श्रीराम सेवाभावी संस्था कोयाळ तालुका आष्टी जिल्हा बीड संचलित स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयातील सर्वगुणसंपन्न श्री. आदिनाथ विठ्ठल पडोळे यांना, शब्दगंध शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.अशी माहिती शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. राजेंद्र उदागे, संस्थापक सचिव, सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांनी दिली. याविषयी अधिकृत असे की,शब्दगंध साहित्यिक परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ,यांच्या वतीने सोळावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन अहिल्यानगर येथे ज्येष्ठ कवयित्री, संमेलनाध्यक्ष श्रीमती संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ आणि ९ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. दरवर्षी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते.त्यामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल शब्दगंध शैक्षणिक पुरस्कार देण्यात येतो.

यावर्षीच्या पुरस्कार निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली असून यावर्षीचा शब्दगंध शैक्षणिक पुरस्कार सन २०२५ या पुरस्कारासाठी श्री.आदिनाथ विठ्ठल पडोळे श्रीराम सेवाभावी कोयाळ,ता.आष्टी,जि.बीड संचलित स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगाव,ता.पाटोदा,जिल्हा बीड येथील शिक्षक महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र राज्य बीड तथा अनुबंध सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.त्यांनी शैक्षणिक,सामाजिक,धार्मिक, पर्यावरण,सेवाभाव,आरोग्य कार्याची दखल घेऊन.शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी दुपारी०३ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, अहिल्यानगर या ठिकाणी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार



आहे.पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शब्दगंध चे सचिव, सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष पांडुळे मामा,सहसचिव, प्रा.डॉ.अनिल गर्जे,सहकार्यवाह प्रा.डॉ.तुकाराम गोंदकर,आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना), आई साखरबाई पडोळे व वडील विठ्ठल पडोळे,मा.शालेय शिक्षण व आरोग्य सभापती उद्धव (बापू) दरेकर,मा.जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ दरेकर,महिला व बालकल्याण सभापती श्रीमती शोभाताई उद्धव दरेकर,युवानेते जयदत्त भैया धस,सरपंच सागर दरेकर, सरपंच राधेश्याम धस,माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब मुळीक,महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव तसेच म.ज्यो. फुले शिक्षक परिषद महाराष्ट्रातून संघटनेचे सर्व पदाधिकारी व शिक्षक वृंद, युवानेते भाऊसाहेब भवर,पंचायत समिती सभापती सुवर्णाताई लांबरुड,सरपंच रवींद्र केकान द्वारका प्रतिष्ठान कडा अध्यक्ष मा.प्राध्यापक श्री.अविनाश भवर,डॉ.प्रा.शाम सांगळे, नगरसेवक राजेंद्र पवार, डॉ.दत्तात्रय नरसाळे,कृषी उत्पन्न बाजार समिती कडाचे संचालक मधुकर सायबर,डॉ.उमेश गांधी, सरपंच संजय थोरवे,सरपंच भरत घोडके,सरपंच केशव चव्हाण,युवानेते ऋषिकेश दरेकर,युवानेते यश दरेकर,बाबुराव चव्हाण,मुख्याध्यापक बबन कोल्हे,श्री.संतोष पडोळे,प्राचार्य शिला अविनाश भवर,पंचायत समिती सदस्य दादासाहेब झांजे,पंचायत समिती सदस्य सुभाष वाळके,पंचायत समिती सदस्य यशवंत खंडागळे,दादासाहेब घोडके,संदीप कारंजकर,राजेंद्र जरांगे, बाळासाहेब झांबरे,भाऊसाहेब घोडके,सागर घोडके,रिजवान शेख, रेवननाथ जाधव,सुहास जगताप, सतीश कोल्हे,अभिजीत कोल्हे,कृष्णा काकडे,चंद्रकांत वाघ,समाधान सोनवणे,अभिजीत कोल्हे,विठ्ठलअशोक चव्हाण,विठ्ठल बारीक चव्हाण, प्रशांत जगताप,डॉ.रोहन लोखंडे , मराठा सेवा संघ आष्टी तालुका अध्यक्ष तान्हाजी जंजिरे व जिल्हाध्यक्ष सर्व पदाधिकारी,संभाजी ब्रिगेड जिल्हा व तालुका अध्यक्ष सर्व पदाधिकारी,तसेच बेस्ट फ्रेंड सर्कल आष्टी,सरपंच शरद काका देसाई, भरतरी झांबरे, प्रा राजेंद्र. डांगे, शिक्षक नेते सिद्धेश्वर शेंडगे,शिक्षक नेते बा.म.पवार मुख्याध्यापक अनिल येरकळ,अशोक साळुंखे,बापु पोकळे मुकुंद लगड,नवनाथ लाड,दत्तात्रेय आवारे,राजू कटके,अमोल लगड, संजय खोटे, संजय शेळके, आप्पासाहेब पवार,भाऊसाहेब भवर सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य समस्त ग्रामस्थ मुगगाव,सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य समस्त ग्रामस्थ टाकळी (अमीय)यांनी अभिनंदन केले.

## अहमदपूर तहसील प्रशासनाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर

# महसूल व पुरवठातील कार्यरत कर्मचारी यांच्यावर तहसीलदाराचा वाच नाही तर; कार्यरत खाजगी इसमाचे मनमानी कारभारावर जोर

## कायम कर्मचारी यांनी हप्तेगिरीच्या वेगात तरबेज तर जनसामान्यांचे प्रश्न ऐरणीवर थेट जनतेतून नाराजीचा सूर?

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**लातूर | विष्णू मोहन पोले**

लातूर:अहमदपुर तालुक्यातील मुख्य शहरातील मध्यवर्ती ठिकाणी कार्यरत असणाऱ्या तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय कार्यरत असुन येथील ग्रामीण भागातील लोकांची गरजा व प्रशासकीय कामे आवश्यकतेनुसार पडतात परंतु स्थानिक आम नागरिक यांना सोयसुविधापासुन महसूल प्रशासनाचे दुर्लक्षच होत आहेच पण कार्यालयातील कार्यरत कायमस्वरूपी कर्मचारी व खाजगी इसमा पासून जनसामान्यांकडुन पैसे वसुली सुरू आहे का...? तर पद्धतीने कार्यरत असणाऱ्या कर्मचारी यांच्यावर थेट जनतेतून नाराजी व्यक्त केली जात आहे. तहसीलदार व उपविभागीय शेजारी असलेल्या कार्यालयातील अधिकारी यांचा वॉच आहे की नाही ही मात्र थेट जनतेतून प्रश्न निर्माण करताना दिसून येत आहेत.वाळु माफियांना तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचा शह..

वाळू माफियांच्या संपर्कात तरबेज कायमस्वरूपी कर्मचारी व त्यांनी ठेवलेल्या खाजगी अधिकारी असल्याची चर्चा सुरू झाली आहे परंतु तहसीलदार यांनी वाळू माफियाकडून हप्ते चालू केल्यांची चर्चा दिसून येत आहे. या हप्त्याच्या माध्यमातून महसूल किती प्रमाणात गोळा झाला यावर जिल्हाधिकारी व कार्यरत अधिकारी यांनी ठोस पाऊल उचलतील का..?

यप्रसंगी महसूल प्रशासनाचा वसुलीचा कारभार दिन मे समशान और रात मे कमीशन यप्रकारे कमिशनच्या माध्यमातून वसुली जोरात सुरू असल्याची चर्चा वेगवेगळ्या चौकात होताना दिसून येत आहे यावर महसूल प्रशासन डोळे झाकून आहे का अशा स्वरूपाची चर्चा मात्र जोरात होत आहे. तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा गैर कारभार पुरवठा विभागात येणाऱ्या अनेक योजना हे जनतेसाठी कि बोगसगिरी व्यक्ती करिता त्यासाठी लागणारी प्रक्रिया, थेट जनतेला वेठीस धरण्यात तरबेज खाजगी पद्धतीने ठेवलेल्या इसमांकडून होणारी पिळवणूक ही मात्र शासनाकडून अवैध असली तरीही आम जनतेला याचं कुठलंही फायदा होत नाही अशी मात्र भूमिका तेथील कार्यरत कर्मचारी यांनी घेतलेली आहे परंतु यावेळी तहसीलदार तथा पुरवठा नायब तहसीलदार कायम कर्मचारी यांचे विशेष दुर्लक्ष होताना दिसून येत आहे व संबंधित अधिकाऱ्याकडे काम पडल्यास केलेल्या फोनवर अधिकाऱ्यांचे विशेष करून दुर्लक्ष




होताना दिसून येत आहे असे जनतेतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

रेशन कार्डला ठरलेली दर व त्याप्रमाणे वसुली थेट तहसीलदार पर्यंत जाते का असेही चर्चा कार्यालयाच्या आवारात होताना दिसते आहे. तरी रेशनकार्ड रद्द व नावे वाढ अथवा कमी करणेकामी पुरवठा विभागाचा जनसामान्यांना सेवा देण्यासाठी तत्पर कि पैसे वसुलीवर भर असे स्वरूपाचे चित्र मात्र चर्चात आहे असं दिसत आहे.

तलाठी सज्जा वरील कोतवाल ते तहसीलदार यांचे सल्लागार..?

तालुक्यातील मागील काळात जिल्ह्यातील स्थानिक अर्जाद्वारे परिक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासनात रुजू झाले परंतु तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचा मनोमनी कारभार सुरू आहेत यावर जिल्हाधिकारी यांनी काय जनतेला उत्तर देणार...?

नवनियुक्त झालेल्या कोतवालांना तहसील कार्यातील साहेबगिरीचे आदेश तहसीलदाराला योग्य की योग्य असे मात्र चर्चा शहरातील अनेक कार्यालयामध्ये व जनसामान्यांच्या कार्यप्रणाली प्रती यांची वागणूक म्हणून दिसून येत आहे असे वाटत असताना तहसीलदारांनी यावर ठोस काय निर्णय घेणार...?

कोतवालांना तहसील कार्यालयामध्ये कामगिरी दिल्याबद्दल थेट तलाठी व मंडळाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली जात आहे परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांना आम्ही अपील व टार्गेट करू शकतो का अशी चर्चा मात्र दबक्या आवाजात होताना दिसून येत आहे. सेतू सुविधा केंद्र, सी एस सी केंद्र,महा.ई सेवा केंद्रावर जनसामान्यांची आर्थिक लुट थांबणार का...?


यात सविस्तर माहिती अशी की ग्रामीण व शहरी भागातील आम जनतेला ऑनलाइनच्या दुनियेत वावरताना थेट व लवकर त्यांचे कामे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने वेगवेगळ्या सुविधेच्या माध्यमातून त्यांना न्याय देण्याचे काम करत असताना अहमदपूर तालुक्यातील संबंध ऑनलाइन केंद्र सेतू सुविधा केंद्र, सी एस सी केंद्र,महा.ई सेवा केंद्रावर होत असलेले आर्थिक लुक तहसीलदार व उपविभागीय अधिकारी अहमदपूर थांबून आम जनतेना न्याय देतील का असं प्रश्न निर्माण होताना दिसून येत आहेत उदाहरणार्थ साध्या कागदावर प्रिंट काढण्यासाठी २० रुपये दर तर ऑनलाइन जातीचा दाखला काढण्यासाठी ६०० रुपये व रहिवासी काढण्यासाठी पाचशे रुपये उत्पन्नाची काढण्यासाठी तीनशे रुपये संजय गांधी निराधार फॉर्म ऑनलाईन करण्यासाठी साडेपाच हजार रुपये अशा स्वरूपाचे विविध कागदपत्राचे दर त्यांच्या मनमानीने जनतेची लूट होताना दिसून येत आहे तर यावर महसूल व उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी आम आम आदमींना न्याय देणार का..? असं स्वरूपाची चर्चा मात्र दबक्या आवाजात शहरातील सावरकर चौकातील ठिक ठिकाणी होताना दिसून येत आहे.

# अहमदपूर तालुक्यात अवैद्य वाळु वाहतूक जोमात राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर रात्री वाळू माफीयांचे राज्य

लोकनेता न्यूज नेटवर्क

लातूर । विष्णू मोहन पोले

अहमदपूर शहरापासून काही किलोमीटर अंतरावर नांदेड परभणी जिल्ह्याचे हद्द असल्याकारणाने गोदावरी नदी पात्राशेजारील गावातून वाळू माफीयांना मुबलक वाळू उपलब्ध होत आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा व लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, चाकूर, उदगीर येथील वाळू माफिया शासनाचा लाखो रुपयाचा महसूल चुकवून अवैद्यरित्या वाळूची वाहतूक करीत आहेत. पोलीस प्रशासन व महसूल विभागाच्या हितसंबंधांमुळे हा सर्व प्रकार गेल्या अनेक महिन्यांपासून राजरोसपणे सुरू असल्याची तक्रार माळेगाव, राळगा, सांगवी, रुई परिसरातील नागरिकांनी माध्यमांकडे केली आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरून उजळ माथ्याने अवैद्य वाळूची वाहतूक तसेच महामार्गा लगत राळगा, तालुका अहमदपूर शिवारात वाळूसाठ्याचा गोरख धंदा अहमदपूर तालुक्यातून सध्या फोफावताना दिसून येत आहे. नांदेड जिल्ह्यातील गंगापूर, पेटसांगवी आदी ठिकाणाहून दररोज रात्री २० हायवा (टिपर )च्या साह्याने राळगा शिवारात वाळू आणून टाकली जाते व तेथून पाच ते सहा जेसीबी च्या साह्याने अहमदपूर, उदगीर, चाकूर येथील ४०ते ४५ हायवा मध्ये पुन्हा वाळू भरून परिसरात पोहोचवली जाते. या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग वाहतूक स्थानिक पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे माफीयांचे फावत आहे. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत आहे या अवैद्य वाहनाच्या सुसाट वेगामुळे रात्रीचे वाहनधारक धास्तावलेले दिसून येत आहेत. विना क्रमांक धावणाऱ्या हायवा ट्रक मधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे. वाळु माफीयांच्या वाढत्या दहशतीमुळे तसेच प्रशासकीय



अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मधुरसंबंधामुळे सर्व काही सुरळीत असल्याची खंत परिसरातील नागरिकांतून होत आहे. प्रशासकीय कर्मचारी अधिकारी तसेच पुढाऱ्यांना हाताशी धरून वाळू माफिया वाळू साठा करून मागणीनुसार वाळू विक्रीचा गोरख धंदा करत आहेत त्यासाठी या वाळू माफियांनी रात्रीची वेळ निवडली आहे. रात्री उशिराने सुरू होणारा हा प्रवास सकाळी अगदी सात वाजेपर्यंत चालतो इतर मंडळी (प्रशासकीय) जरी या प्रकरणापासून अनभिज्ञ असले तरी स्थानिक रहिवाशी मात्र नक्कीच या प्रकरणापासून अनभिज्ञ नाहीत, नागरिकांनी या प्रकरणास वाचा फोडण्यासाठी माध्यमाकडे धाव घेऊन हे प्रकरण प्रकाश झोतात घेऊन येण्यासाठी पुढाकार घेतला मात्र वाळू माफीयांचा व पोलीस प्रशासनाचा ससेमिरा नको म्हणून त्यांनी आपलं नाव छापण्यास असमर्थता दर्शवली, परिसरातील अनेक नागरिकांच्या मोबाईल मध्ये अवैध्य वाळू माफियांच्या गोरख धंद्याचे चित्रीकरण छायाचित्र उपलब्ध असल्याचे नागरिक सांगतात. ज्याच्या शेतात वाळूसाठा त्याच्याच जीवितास धोकामौजे राळगा येथील जमीन गट नंबर १५२ व १६३ ही सखाराम नामदेव राठोड यांच्या मालकीचे असून त्यांनी दिनांक २२/ १/ २०२३ रोजी तहसील प्रशासनास एका निवेदनातून असे कळविले होते की त्यांच्या शेतात त्यांच्या परवानगीशिवाय रोज रात्रीला ५०ते ६० हायवा, ने रोज ८०० ब्रॉस रेती टाकली जाते व उचलली जाते वाळू माफियांना याबाबत विचारणा केली असता त्यांना अंगावर गाडी घालून जीवे मारण्याची धमकी दिली जाते प्रशासनाने माझ्यावर होत असलेल्या अन्याय लक्षात घेऊन मला न्याय मिळवून द्यावा अन्यथा मी उपोषणास बसणार आहे किंवा आत्महत्या करणार आहे असे त्यांनी या निवेदनातून प्रशासनात सांगितले आहे.

## जनुना या गावी त्यागमूर्ती माता रमाई जयंती मोठ्या थाटात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

महागाव । विजय थोरात

नजदीक असणारे जनूना गावी त्यागमूर्ती माता रमाई जयंती मोठ्या थाटात संपन्न झाली. त्यागमूर्ती माता रमाई महिला मंडळ तसेच पंचशील नव युवक मित्र मंडळ यांच्या उपस्थितीत पार पडली

जयंतीला अनेक मान्यवर उपस्थित होते. उपसरपंच्या कोमल ताई विजय थोरात. पोलीस पाटील. सीमाताई छत्रपती इंगोले. ग्रामपंचायत सदस्य मा. कोंडाबाई केरबाजी थोरात. ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर कोंडबाजी इंगोले. तंटामुक्ती अध्यक्ष बापूराव रामा दवणे. व्यवस्था समितीचे अध्यक्ष मुकिंदा खिल्लारे उपाध्यक्ष राजू इंगोले. शेख महबूब. राजकुमार नरवाडे. राहुल नरवाडे बौद्धाचार्य कौशल्याबाई वाठोरें अनुसयाबाई गायकवाड लताबाई दवणे अंगणवाडी सेविका सीमा अडागळे आशाताई जया ताई दवणे सिटी इन इंडिया जिल्हा संपादक एस के शब्बीर व



संपूर्ण गावकरी मंडळी उपस्थित होती त्यानंतर बालकांचे रमामाते बद्दल भाषणे झालीत चिमुकल्या मुलांनी गाणी म्हटली भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला संपूर्ण गावात मिरवणूक झाली.

## स्व.बापूसाहेब देशमुख गोरठेकर क्रीडा महोत्सवास सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरी । महेश पडोळे

उमरी तालुक्याचे भाग्यविधाते, शिक्षण महर्षी, लोक नेते माजी आमदार स्वर्गीय कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर साहेबांच्या स्मृतीत 'स्व. बापूसाहेब देशमुख गोरठेकर क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आज नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्थेचे सचिव मा. कैलासभाऊ देशमुख गोरठेकर साहेब यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम गाटे, उप प्राचार्य डॉ. विलास गणिपूरकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. बळीराम इंगळे, नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एन. एल. लखमोड, यशवंत विद्यालय आणि ज्यूनिअर



कॉलेजचे प्राचार्य श्री. बी. जी. जाधव, श्री शाहू महाविद्यालय, भोकरचे प्राचार्य श्री. एस. एम. देशमुख इ.ची उपस्थिती होती.

या क्रीडा महोत्सवाचे आयोजन नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्था संचलित, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरीच्या वतीने दि. ०७ ते ०९ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत करण्यात आले.या महोत्सवात नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्था आणि श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्था अंतर्गत सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ, कॅरम, रस्सीखेच इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा महोत्सवाचा समारोप रविवारी होणार आहे.या महोत्सवाच्या आयोजनात कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम गाटे, उप प्राचार्य डॉ. विलास गणिपूरकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. बळीराम इंगळे आणि सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.

### दिमाखदार सोहळ्यात खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण

## क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू घडतील-आमदार विजयसिंह पंडित



लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत

पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीने घेतलेल्या जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या क्रीडामहोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. पुढील काळात या क्रीडा महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुक्यातील इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले जावे. कोणत्याही क्षेत्रात ध्येय गाठायचे असेल तर सराव आणि सातत्य महत्वाचे आहे. वर्षभर खेळाचा सराव आणि स्पर्धेमध्ये सातत्य ठेवल्यामुळे गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागामधील खेळाडू या महोत्सवात घडत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. विजयाच्या उन्मादाने वागायचे नाही आणि पराभवाने खचून जायचे नाही ही भूमिका ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण करताना ते बोलत होते.

शारदा स्पोर्ट्स कडमीच अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन शारदा विद्या मंदिर गेवराई येथे करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित, सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले, नगरसेवक शाम येवले, युवानेते पृथ्वीराज पंडित, डॉ.अशोक काळे, दत्ताभाऊ पिसाळ, नवीद माशायक, दीपक आतकरे, खाजा मामू, विष्णुपंत घोंगडे, संतोष सुतार, दिनेश घोडके, वसिम फारोकी, विजय सुतार, सरवर पठाण, संदीप मडके, दत्ता दाभाडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातील आपल्या मातीतील खेळाडू घडावेत आणि पुढे जावेत, हे माझे स्वप्न आहे. आपल्या भागातील विद्यार्थी उद्या देशाचे नेतृत्व करतील याचा मला विश्वास आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंनी आपली चमक दाखवली. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थी खेळाडूंची मेहनत यामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वी झाला आहे. यापुढील काळातही व्यापक पद्धतीने क्रीडा महोत्सव घेवून क्रीडा क्षेत्रात गेवराई तालुक्याची वेगळी ओळख निर्माण होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शिवछत्र परिवाराने गेल्या अनेक वर्षा पासून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केले असून मला सुद्धा यातूनच फुटबॉल क्षेत्रामध्ये नाव कमावता आले. रणवीर पंडित यांची तळमळ ही आपल्या भागातील विद्यार्थ्यांना घडवायची आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून त्यांनी गेवराई तालुक्यात खेळाचे वातावरण तयार केले आहे. त्यामुळेच शिवशारदा पब्लिक स्कूल आणि शारदा क्रीडा कडमच्या फुटबॉल खेळाडूंची महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण झाली ही अभिमानाची गोष्ट आहे. आपण दोन घंटे जिद्दीने आणि तळमळीने या खेळासाठी दिले तर या भागातील विद्यार्थी यशाचे शिखर गाठेल असे प्रतिपादन फुटबॉलचे राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक नवीद मशायक यांनी केले. खेळाची मोठी परंपरा शिवाजीराव दादा पंडित परिवाराला आहे. तोच वसा आणि वारसा घेऊन रणवीर पंडित यांनी सर्व सामन्यांची लेकरं देश पातळीवर क्रीडा क्षेत्रात चमकावीत हे स्वप्न पहिले. आणि ते साध्य करण्यासाठी धडपड करत आहेत. खेळाडूना ऊर्जा मिळावी म्हणून हा क्रीडा महोत्सव होत असून ग्रामीण भागातील लेकरांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचे काम शिवछत्र परिवार करत आहे असे गौरवोद्गार सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले यांनी काढले.कार्यक्रमात जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना विजयसिंह पंडित म्हणाले की, पराभवाला खचून न जाता एक ध्येय ठेवून मी काम सुरु केले. कामात सातत्य ठेवले. लोकामध्ये मिसळत गेलो. त्यामुळे मला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. शिवछत्र परिवार हा व्यापक आहे. शिवछत्र परिवारातील प्रत्येक सदस्याने माझ्यासाठी लोकामध्ये जाण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच मला हे यश मिळाले. माय बाप मतदारांचे आशीर्वाद, कार्यकर्ते आणि जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील प्रत्येक कर्मचार्याने प्रामाणिकपणे मेहनत आणि कष्ट केल्यामुळे मला प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली असून आपल्याला जमिनीवर राहून काम करायचे आहे. आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी आपल्याला सर्वांना मिळून काम करायचे आहे. गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये मोठे काम करून एक आदर्श निर्माण करायचा आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, बुद्धीबळ, स्पर्धेतील विजेत्या खेळाडूना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ज्ञानेश्वर धापसे, अमोल राठोड यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट खेळाडू म्हणून यशराज तिपाले, ज्योती तागड, करण पवार, सखू राठोड, कार्तिक वाघ, अमृता ठोंबरे, अतिश पवार, ऋतुजा बावचकर, देवराज निकम, अमर घाडगे, कोळेकर अश्विनी यांचाही सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट शाळा म्हणून शिवशारदा पब्लिक स्कूलचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील तिन वर्षापासून क्रीडा महोत्सव उत्कृष्ट पद्धतीने आयोजित केल्या बद्दल शिवशारदा पब्लिक स्कूलच्या वतीने रणवीर पंडित यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाराव काकडे व सुधीर गाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर यांनी मानले. यावेळी सहप्रशासन अधिकारी प्रा.काशिनाथ गोगुले, प्रताप हातोटे, प्राचार्य डॉ.विश्वास कदम, डॉ.सदाशिव सरकटे, डॉ.राजाभाऊ चव्हाण, प्राचार्या क्षीरसागर, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, किशोर पंडित, वसंत राठोड, रणजीत सानप, दत्तात्रय देशपांडे, तौर अशोक, सय्यद युनुस, अरुण हाटकर, भक्तराज पौळ, शिवाजी पाटोळे, भागवत राऊत, पवार बबन, पवार विश्वनाथ, पवार मुरलीधर, संतराम राठोड, लक्ष्मण काळे, दिलीप पवार, विजय येवले, बोरुडे सुनील, महारुद्र राख, रोहिणी लाखुटे, रमेश डावकर, राजूरकर उमेश, हरिभाऊ हाकाळे यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व क्रीडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.शशिकांत खेडेकर मातृतीर्थ मतदार संघात राबविणार जनसंपर्क अभियान

## मा जिजाऊच्या आशीर्वाद घेऊन करणारा अभियानाला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा लाडके भाऊ शिवसेना मुख्य नेते मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री, यांच्या वाढदिवसानिमित्त मा.ना.श्री. प्रतापरावजी जाधव, केंद्रीय मंत्री, आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य राज्यमंत्री, भारत सरकार तथा खासदार बुलडाणा जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली मा.खा श्री. श्रीकांतजी शिंदे, मा.श्री. संजयजी मोरे, सचिव शिवसेना यांच्या सुचनेनुसार, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघातील २१४ गावांचा जनसंपर्क दौरा माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर हे ९ फेब्रुवारी रोजी माँ जिजाऊंचे आशीर्वाद घेऊन सुरुवात करणार आहे तर समारोप उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे .या अभियानात शिवसेना शाखाबांधणी,शिवसेना सदस्य नोंदणी अभियान (शिवकार्य) राबविण्यात येणार आहे. शिवसेना परिवाराचे सदस्य होण्याकरिता मो. ७७०३०७७०३० या क्रमांकावर कॉल ड्वड द्वारे येणाऱ्या लीक वर माहिती भरून शिवसेनेचे अधिकृत सदस्य होण्याचे आव्हानही डॉ. शशिकांत खेडेकर यांनी केले आहे.



सर्व सामान्य जननेता तसेच शेतकरी बाधवांना महसुली कागदपत्रे काढण्यासाठी लागणारा विलंब टाळण्यासाठी, एकाच ठिकाणी अंग्रीस्टंक फॉर्मर आयडी साठी, रेशनकार्ड मध्ये नवीन नाव सामाविष्ठ करणे तसेच रेशनकार्डमधून नाव वेगळे करणे, प्रमाणपत्र, डोमेसाईल, नॉनक्लिमरियर,उत्पत्राचा दाखला, पी.एम किसान योजना, पी.एम. नीधी फण्ड, आयुष्यमान भारत, श्रावणबाळ मानधन योजना, संजय गांधी निराधार विधवा मानधन योजना, इत्यादी प्रमाणपत्रांसाठी लागणारी आवश्यक ती कागदपत्रांची माहिती गावातील शिवसेना नेते अथवा शाखा प्रमुखाकडे उपलब्ध राहतील . लाभार्थी यांनी आवश्यक ती कागदपत्रे शिवसेना नेते अथवा शाखा प्रमुखाकडे जमा करावी. जेथे कैम्प होईल तेथे सदरहू कागदपत्रे जमा करावी. कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर गावांमध्ये अथवा सोयीनुसार विभाग निहाय कॅम्प प्रलावून कागदपत्रांची माहिती घेवून प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार असल्याचे देखील डॉ. शशिकांत खेडेकर यांनी सांगितले या जनसंपर्क अभियान व आभारामध्ये सदर गांवातील समस्या व शेतकऱ्यांच्या समस्या सुध्दा जाणून घेतल्या जातीन,

मातृतिर्थ सिंदखेड राजा वि.स.म. संघामध्ये सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये आमदार असतांना व सन २०१९ ते २०२४ या कालावधी मध्ये आमदार नसतांनासुध्दा मागील गेल्या २० ३० वर्षात जेव्हढी विकास कामें झाली नसतील त्यापेक्षा कितीतरी पट विकास निधी आणुन प्रचंड विकास केला याची जाणीव या मतदार संघातील जनतेला असुन, सर्वसामान्य जनतामान्य करते. मतदार संघातील जनतेच्या सतत संपकांत राहिलो, सुख दुखात सामिल झालो, कोणत्याही प्रकारे जाती-पातीचे राजकारण केले नाही जो येईल त्याचे काम केले, सर्व समाजाच्या गावामध्ये विकासकामे काठी कोणताही जातीभेद कधीही केला नाही तरी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये माझा पराभव झाला. हे करत असतांना माझे काय चुकले ? कोठे चुकले? याबावत गावकरी व कार्यकर्ते यांच्यासोबत चर्चा करुन आत्मचिंतन करणार असल्याचे डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी सांगितले.त्यामुळे गावांगावामध्ये जेव्हा जनसंपर्क अभिमान व आभार यात्रा होईल त्या तारखेला व त्या वेळेला गावकऱ्यांनी व शिवसैनिकांनी उपस्थित रहावे असे आवाहनही डॉ. शशिकांत खेडेकर यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शिक्षणाचे ध्येय-राजेंद्रजी देशमुख

### सरस्वती इंग्लिश स्कूल व विद्यालयांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन थाटामाटात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकरदन । राम शिंदे





भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील प्रसिद्ध शाळा सरस्वती विद्यालय व सरस्वती इंग्लिश स्कूल पिंपळगाव रेणुकाई यांच्या संयुक्त विद्यमानाने वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात संपन्न झाला तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक मा.आ. संतोष पाटील दानवे भोकरदन जाफराबाद विधानसभा, या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभले ह भ प ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर अखंड व्यसनमुक्ती प्रसारक, प्रमुख अतिथी, मा श्री सुरेश पाटील बनकर ज्येष्ठ नेते सिल्लोड सोयगाव मतदारसंघ, गणेश पाटील ठाले भाजपा तालुका अध्यक्ष भोकरदन, परमेश्वर लोखंडे मा.सभापती पंचायत समिती भोकरदन, गणेश लोखंडे पंचायत समिती सदस्य भोकरदन, अशोकराव गरुड मा सभापती पंचायत समिती सदस्य सिल्लोड, डॉक्टर तांदूळजे सामाजिक कार्यकर्ते, मा श्री सुकलाल बोडखे, उपसभापती पंचायत समिती भोकरदन, मोतीराम अण्णा नरवाडे संचालक रामेश्वर कारखाना, अंबादास शेठ बावस्कर मा. जी प सदस्य जालना, कौतिकराव पाटील जगताप सभापती कृषी उत्पादन भोकरदन, ह भ प विष्णु महाराज सास्ते भागवताचार्य पिंपळगाव, अरुण पाटील काळे मा उपसभापती पंचायत समिती सिल्लोड, श्री सांडू पाटील वाघ भाजपा तालुका उपाध्यक्ष, सौ सुनीताताई सपकाळ जिल्हा परिषद सदस्य जालना, कार्यक्रमाचे विशेष आकर्षक जु भाऊ कदम, सिद्धार्थ सोनवणे १५२ मिमिक्री आवाजाचा बादशाह, आपले विनीत.. राजेंद्रजी देशमुख अध्यक्ष, श्री रावसाहेब देशमुख उपाध्यक्ष, श्री सुभाष देशमुख सचिव, श्री शंकरराव देशमुख सहसचिव, श्री एन एम लोखंडे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री एके बावस्कर प्रशासकीय अधिकारी, श्री डी ए गोरे प्राचार्य इंग्लिश स्कूल, श्री डी टी खंडाळकर प्राचार्य सरस्वती विद्यालय, श्री एम व्ही देशमुख उपप्राचार्य सरस्वती विद्यालय, पंचक्रोशीतील पालक मंडळी आयोजक मंडळी सन्माननीय संचालक व सांस्कृतिक विभाग प्रमुख शिक्षक वृंद शिक्षक तर कर्मचारी तसेच सर्व कर्मचारी वृंद सरस्वती परिवार पिंपळगाव रेणुकाई.

# नापिकी झाल्यामुळे शेतकऱ्यांची गळफास लावून आत्महत्या

लोकनेता न्यूज नेटवर्क

महागाव । विजय थोरात



सतत नापिकी झाल्यामुळे आर्थिक विवेचनातून टोकाचे पाऊल उचलत एका शेतकऱ्याने लिंबाच्या झाडाला दोर बांधून त्याद्वारे गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना ६ फेब्रुवारी सकाळी सात वाजताच्या सुमारात महागाव जवळ असणारे. आमणी खुर्द ग्रामपंचायत शिवारात उघडकीस आली. बालाजी चंपत काळबांडे (४०) राहणार आमनी( खुर्द ) असे गळफास लावून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. ते वडीला पारिजीत शेती कसून कुटुंबाचा गाडा ओढायचे मात्र गेल्या काही वर्षात त्यांना सतत ना पैकी झाली. यंदा तरी चांगली उत्पन्न होईल अशी अपेक्षा होती. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदाही त्यांना नापिकी झाली. त्यामुळे गेल्या काही दिवसापासून ते आर्थिक विवेचनात होते. शेती कसण्यासाठी घेतलेले ५० हजार रुपयांचे कर्ज फेडायचे कसे या विवेचनात ते होते. त्यातूनच टोकाचे पाऊल उचलत त्यांनी ६ फेब्रुवारीला सकाळी घराबाहेर पडत गावाला लागून असलेल्या सखाराम मंने राहणार अमणी ( खुर्द) यांच्या शेतातील कडुलिंबाच्या झाडावर दोर बांधून त्याद्वारे गळफास घेत आत्महत्या केली. ही बाब दिलीप काळबांडे काळी वेळाने लक्षात आली. मात्र तोवर खूप उशीर झाला होता. त्यानंतर माहिती महागाव पोलीस स्टेशन ला दिली पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला.पोस्टमार्टम साठी सरकारी दवाखान्यात पाठवले. या घटनेमुळे काळबांडे परिवारावर दुःखांचा डोंगर कोसळून पडला.

# जन्मदात्या आईनेच केली पोटच्या मुलांची हत्या !

### स्वामीचिंचोली येथील धक्कादायक घटना

लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

स्वामी चिंचोली (ता.दौंड) येथील शिंदे वस्ती परिसरात घरगुती वादातून आईकडून दोन लहानग्या मुलांची हत्या करण्यात आली असून नवऱ्यावर देखील प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे या प्रकरणी दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती दौंड पोलिसांनी दिली.



सदरील घटना शनिवार दि.८ रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडली असून आईनेच दोन मुलांची हत्या करून नवऱ्यावर प्राण घातक हल्ला करण्यामागील कारण समजू शकले नसल्याची माहिती दौंड पोलिसांनी दिली.या घटनेत सायली दुर्योधन मिंढे सव्वा दोन वर्षे मुलीचा, तर हर्ष दुर्योधन मिंढे स्ववा वर्षीय मुलाचा निर्दयी आईने गळा व तोंड दाबून हत्या केली तर दुर्योधन आबासाहेब मिंढे (वय ३५) पती झोपेतच असताना मानेवर व डोक्यावर तिष्ण हत्याराने वार करून गंभीर जखमी केले आहे जखमी दुर्योधन वर बारामती येथील खाजगी हॉस्पिटल मध्ये उपचार चालू असून दौंड पोलिसांनी कोमल दुर्योधन मिंढे (वय ३२) हीस आपल्याच निरागस लहानग्या मुलांच्या खून प्रकरणी ताब्यात घेतले आहे

या दुर्दैवी घटनेने स्वामी चिंचोली परिसरात शोककळा पसरली असून कोमल हिच्या निर्दयपणाने दोन मुलांना जीव गमवावा लागला असून या प्रकरणाला पती-पत्नी मधील घरगुती वादाची किनार असली तरी हत्याकांडापर्यंत प्रकरण गेल्याने दौंड पोलीस या प्रकरणाचा कसोशीने तपास करीत आहेत.

दुर्योधन मिंढे हा सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून खराडी येथील एका खाजगी कंपनीत काम करत असून तो सध्या घरूनच कामकाज करीत होता दोन्ही पती-पत्नी उच्चशिक्षित असतानाही वरील दुर्दैवी प्रकार घडल्याने अनेकांनी शंका उपस्थित केली आसून, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस,पोलीस निरीक्षक गोपाळ पवार,दौंड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ पाटील,पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कुंभार,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गोरख मलगुंडे यांनी घटनास्थळी भेट दिली,आणि पुढील अधिक तपास करीत आहेत.

# सवना येथील जि.प.शाळेची नवीन इमारत ग्रामपंचायतची नवीन इमारत यासह विविध मागण्याचे जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर

लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

सवना येथील सामाजिक कार्यकर्ते विजय वानखेडे यांनी सवना येथील जिल्हा परिषद शाळेची नवीन इमारत मिळणेबाबत, सवना ग्रामपंचायतची नवीन इमारत मिळणेबाबत, सेनगाव तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांचे राशन बंद झाले आहे शासन नियमा नुसार केसरी राशन लाभार्थ्यांच्या खात्यावर रोख रक्कम टाकण्यात यावी सवना गाव व तालुक्यातील ज्या गावचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोखरा कार्यकाळ संपलेला आहे सवना गावासह असे गाव पोखरा दोन मध्ये समाविष्ट करण्याबाबत तसेच जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय हिंगोली यांनी पाठवलेल्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्यात यावी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी नवीन शौचालय बांधकाम करून देण्यात यावे यासह इतर मागण्याचे निवेदन जिल्हा परिषद शाळेला देण्यासाठी आले असता जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आले असून लवकरात लवकर या मागणीवर कारवाई करण्यात यावी अन्यथा दिनांक २७ फेब्रुवारी वार गुरुवारी रोजीच्या साडेबारा वाजता लोकशाही मार्गाने धरणे आंदोलनकरण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा प्राथमिक जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय वानखेडे यांच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.



# वरुड(चक्रपान) येथे गो माता डोहाळे कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

सेनगाव तालुक्यातील वरुड (चक्रपान )येथे गोमाता डोहाळे जेवण कार्यक्रम संपन्न झाला शिवाजी फाले यांनी गोमाता डोहाळे कार्यक्रम वरुड चक्रपान येथे ठुला असता गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते व महिलांची ही उपस्थिती मोठ्या संख्येने होती गोमातेला एखाद्या सदस्य प्रमाणे सांभाळणे हे शिवाजी फाले यांनी दाखवून दिले आहे या आपल्या घरच्या सदस्या प्रमाणे सांभाळणारे शिवाजी फाले यांनी जगासमोर उदाहरण पुढे ठुले आहे तालुक्यातून व जिल्ह्यातून या कार्यक्रमाची सगळेजण कौतुक करत आहेत या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





लोहा नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे साहेब यांनी लोहा प्रीमियर लीग येथे खेळाडूंना प्रोत्साहन देऊन शुभेच्छा दिल्या सोबत नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर भिसे संपादक गजानन दांगटे आदी जण उपस्थित होते(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क लोहा विशाल घंटे)

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904